MHAU060005982006

**नियमित दिवाणी दावा क्र.७७/२००६ मधील नि.क्र.२०१ खालील आदेश**

प्रस्तुत अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे. वादीचे कथन की, वादींनी दावा मिळकतींच्या वाटपासाठी प्रस्तुत दावा दाखल केला असुन तो सुनावणीसाठी प्रलंबित आहे. सुरुवातीस वादी क्रं. १ बिजलाबाईने सदरचा दावा दाखल केला होता. मात्र दाव्यात कुंटूंबाच्या काही मिळकतींचाच समावेश करण्यात आला आहे. वादी क्रं. २ केसरबाई ही मुळची प्रतिवादी क्रं. ४ होती आणि तिलाही वाद मिळकतीत तिचा हिस्सा वाटुन हवा असल्याने तिने अर्ज देवुन स्वतःला वादी क्रं. २ म्हणुन समजण्यात यावे यासाठी अर्ज केला होता जो मंजुर झाला आहे. त्या अनुषंगाने दाव्यात काही दुरुस्त्या करणे आवश्यक झाले होते व ते मा. न्यायालयाने मंजुर केले असुन त्यानुसार दाव्यात आवश्यक ती दुरुस्ती करण्यात आली होती व दुरुस्ती दावा देखील मा. न्यायालयात दाखल करण्यात आलेला आहे. मात्र सदर दुरुस्ती दाव्यामध्ये नजरचुकीने श्री. नामदेव विठोबा झिम्मन यांच्या मृत्युची तारीख ही ''६.१०.२००१'' ऐवजी ''६.१०.२०११'' दर्शविण्यात आलेली आहे. सदरची चुक ही टंकलेखन करतांना नजरचुकीने व अनावधानाने झालेली आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये पुराव्याचे शपथपत्र तयार करतेवेळी वादी श्रीमती बिजलाबाई भास्करराव आहेर यांचे लग्नानंतर नावात बदल झालेला आहे असे त्यांनी सांगितलेवरुन प्रकरणात भविष्यात तांत्रीक पेच निर्माण होवु नये या उददेशाने देखील खालील दुरुस्ती करणे गरजेचे झाले आहे. वादी खालीलप्रमाणे दुरुस्ती सुचवीत आहेत–

(अ) दाव्याचे पान क्रं. १ वर वादींच्या नावांमध्ये ''बिजलाबाई'' या नावानंतर व ''भ्र.'' च्या आधी ''उर्फ अहिल्याबाई'' याचा समावेश करण्यात यावा. तसेच दाव्यामध्ये ज्या ज्या ठिकाणी ''बिजलाबाई'' असे नमुद आहे तेथे ''बिजलाबाई उर्फ अहिल्याबाई'' अशी दुरुस्ती करण्यात यावी.

(आ) मुळ दाव्यामध्ये आणि दुरुस्ती दाव्यामध्ये ज्या ज्या ठिकाणी नामदेव विठोबा झिम्मन यांची मृत्युची तारीख ''६.१०.२००१'' व ''६.१०.२०११'' अशा नमुद आहेत त्या त्या ठिकाणी ''२७.९.२००१'' अशी दुरुस्ती करण्यात यावी.

(इ) मुळ दाव्यामध्ये आणि दुरुस्ती दाव्यामध्ये परिच्छेद क्रं. २ मध्ये ओळ क्रं. २ मध्ये अंदाजे या शब्दानंतर ''३ महिन्यांपुर्वी'' आकडा आणि शब्द वगळण्यात यावा आणि त्यांचे जागी ''दिनांक २३.१२.२००५ रोजी'' हे शब्द आणि तारीख अशी दुरुस्ती करण्यात यावी.

वरील प्रस्तावित दावा आणि दुरुस्ती दाव्यामध्ये करण्यात येणा–या दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलणार नाही व प्रतिवादींचे हक्कास काही बाधाही पोहोचत नाही. सबब दुरुस्तीस

11/01/24

मंजुरी देणे योग्य व न्यायाचे होईल. त्यामुळे सदर अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

२. सदर अर्जास प्रतिवादी क्रं. ३ व ६ यांनी सदर अर्जाच्या पाठीमागील बाजुस म्हणने दाखल करुन त्यांचा सदर अर्ज मंजुर करण्यास आक्षेप नाही असे म्हणने दिले.

३. सदर अर्जास प्रतिवादी क्रं. १ व ५ यांनी नि.क्रं. २०२ वर म्हणने दाखल करुन हरकत घेतली की, वादीने दिलेला अर्ज हा कायद्याच्या विपरित असुन केवळ प्रकरण लांबविण्यासाठी सदरीलचा अर्ज दिलेला आहे. सदरील वादीचा दावा हा २००६ पासुन मा. कोर्टात प्रलंबित असतांना वादीने १७ वर्षानंतर सदरील दाव्यात दुरुस्तीबाबतचा अर्ज दिला आहे. वादीने अर्जामध्ये नामदेव विठोबा झिम्मन यांची मृत्युची तारीख दि.०६.१०.२००१ ऐवजी ०६.१०.२०११ दर्शविण्यात यावी अशी अर्जामध्ये मागणी केली आहे. जी वादीला यापुर्वीच करता आली असती पण सदरील अर्ज देण्याबाबत झालेल्या विलंबाबाबत कोणतेही कारण दर्शविण्यात आलेले नाही. अर्जातील कलम नं. २ मजकुर की, प्रस्तुत प्रकरणात शपथपत्र तयार करतांना नावामध्ये चुक झाली आहे किंवा नावात बदल झाला आहे. ही बाब वादीला दावा देतांना सुध्दा माहित होती दावा देतांनाच सदरील बाबींचा उल्लेख करणे आवश्यक होते. वादी यांनी मा. कोर्टात केवळ प्रकरण लांबविण्यासाठी सदरील दुरुस्तीचा अर्ज दिला आहे. तसेच बिजलाबाईचे नाव अहिल्याबाई असल्याबाबतचे कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जासोबत दाखल केलेला नसुन अर्जात तसे नमुद करण्यात आलेले नाही. २-अ. वादीने अर्जाचे परिच्छेद क्रं. १ मधील खालुन दुस-या ओळीमध्ये नामदेव विठोबा झिम्मन यांच्या मृत्युची तारीख ०६.१०.२००१ ऐवजी ०६.१०.२०११ दर्शविण्यात आली आहे व तसेच पान क्रं. २ परिच्छेद क्रं. २ आ मध्ये वादी यांनी नामदेव विठोबा झिम्मन यांच्या मृत्युची तारीख ०६.१०.२००१ व ०६.१०.२०११ अशा नमुद आहे त्या ठिकाणी २७.०९.२००१ अशी दुरुस्ती करण्यात यावी असा अर्जामध्ये उल्लेख केला आहे. ज्यामुळे नामदेव विठोबा झिम्मन याची मृत्यु तारीख नेमकी कोणती आहे व नेमके वादीला काय दुरुस्ती करायची आहे याचा बोध होत नाही. दिनांक २७.०९.२००१ चे मृत्युबाबत वादीने काही एक कागदोपत्री पुरावा अर्जासोबत दाखल केलेला नाही. २-ई. दाव्याचे आणि दुरुस्ती दाव्याचे परिच्छेद क्रं. २ मध्ये ओळ क्रं. २ मध्ये अंदाजे या शब्दानंतर ३ महिन्यापुर्वी या शब्दानंतर २३.१२.२००५ अशी तारीख नमुद करण्यात यावी असा अर्जात उल्लेख केलेला असुन सदरील दुरुस्ती मंजुर केल्यास दाव्याच्या स्वरुपात बदल होत असुन सदरील दुरुस्तीचा वादी हा दाव्यात असलेल्या त्रुटी भरुन काढत असुन त्याचा परिणाम हा प्रतिवादी यांच्या हक्कावर होत असल्यामुळे सदरील दुरुस्ती ही मा. कोर्टास मंजुर करता येऊ शकत नाही. सदरील दुरुस्तीचा अर्ज हा वादीने अत्यंत उशिरा दिलेला असल्यामुळे सदरीलचा अर्ज मा. साहेबांनी नामंजुर करणे आवश्यक आहे.

४. प्रतिवादी क्रं. ८ व ९ यांनी नि.क्रं. २०३ वर पुरशीस दाखल करुन प्रतिवादी क्रं. १ व

11/1/24

५ यांनी दिलेले लेखी उत्तर हेच लेखी उत्तर प्रतिवादी क्रं. ८ व ९ यांचे समजण्यात यावे म्हणुन पुरशिस दिली.

५. सदर अर्जास प्रतिवादी क्रं. २ व १० ते १४ यांनी नि.क्रं. २०४ वर म्हणने दाखल करुन हरकत घेतली की, वादीने दिलेला अर्ज हा कायद्याच्या विपरित असुन केवळ प्रकरण लांबविण्यासाठी सदरीलचा अर्ज दिलेला आहे. सदरील वादीचा दावा हा २००६ पासुन मा. कोर्टात प्रलंबित असतांना वादीने १७ वर्षानंतर सदरील दाव्यात दुरुस्तीबाबतचा अर्ज दिला आहे. वादीने अर्जामध्ये नामदेव विठोबा झिम्मन यांची मृत्युची तारीख दिनांक ०६.१०.२००१ ऐवजी ०६.१०.२०११ दर्शविण्यात यावी अशी अर्जामध्ये मागणी केली आहे. जी वादीला यापुर्वीच करता आली असती पण सदरील अर्ज देण्याबाबत झालेल्या विलंबाबाबत कोणतेही कारण दर्शविण्यात आलेले नाही. अर्जातील कलम नं. २ मजकुर की, प्रस्तुत प्रकरणात शपथपत्र तयार करतांना नावामध्ये चुक झाली आहे किंवा नावात बदल झाला आहे ही बाब वादीला दावा देतांना सुध्दा माहित होती वादीने दावा देतांनाच सदरील बाबींचा उल्लेख करणे आवश्यक होते. वादी यांनी मा. कोर्टात केवळ प्रकरण लांबविण्यासाठी सदरील दुरुस्तीचा अर्ज दिला आहे. तसेच बिजलाबाईचे नाव आहिल्याबाई असल्याबाबतचे कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जासोबत दाखल केलेला नसुन अर्जात तसे नमुद करण्यात आलेले नाही. २अ– वादीने अर्जाचे परिच्छेद क्रं. १ मधील खालुन दुस–या ओळीमध्ये नामदेव विठोबा झिम्मन यांच्या मृत्युची तारीख ०६.१०.२००१ ऐवजी ०६.१०.२०११ दर्शविण्यात आली आहे व तसेच पान नं. २ परिच्छेद क्रं. २आ मध्ये वादी यांनी नामदेव विठोबा झिम्मन यांच्या मृत्युची तारीख ०६.१०.२००१ व ०६.१०.२०११ अशा नमुद आहे त्याठिकाणी २७.०९.२००१ अशी दुरुस्ती करण्यात यावी असा अर्जामध्ये उल्लेख केला आहे. ज्यामुळे नामदेव विठोबा झिम्मन याची मृत्यु तारीख नेमकी कोणती आहे व नेमके वादीला काय दुरुस्ती करायची आहे याचा बोध होत नाही. दिनांक २७.०९.२००१ चे मृत्युबाबत वादीने काही एक कागदोपत्री पुरावा अर्जासोबत दाखल केलेला नाही. २ई– दाव्याचे आणि दुरुस्ती दाव्याचे परिच्छेद क्रं. २ मध्ये ओळ क्रं. २ मध्ये अंदाजे या शब्दानंतर ३ महिण्यापुर्वी या शब्दानंतर २३.१२.२००५ अशी तारीख नमुद करण्यात यावी असा अर्जात उल्लेख केलेला असुन सदरील दुरुस्ती मंजुर केल्यास दाव्याच्या स्वरुपात बदल होत असुन सदरील दुरुस्तीचा वादी हा दाव्यात असलेलया त्रुटी भरुन काढत असुन त्याचा परिणाम हा प्रतिवादी यांच्या हक्कावर होत असल्यामुळे सदरील दुरुस्ती ही मा. कोर्टात मंजुर करता येऊ शकत नाही. सदरील दुरुस्तीचा अर्ज हा वादीने अत्यंत उशिरा दिलेला असल्यामुळे सदरीलचा अर्ज मा. साहेबांनी नामंजुर करणे आवश्यक आहे.

६. सदर अर्जास प्रतिवादी क्रं.७ यांनी कोणतेही म्हणने दाखल न केल्यामुळे सदर अर्जाचे कामकाज त्याच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्यात आले.

11/1/24

७. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. युक्तीवाद ऐकला.

८. वादीने सदर दावा वाटपासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये माझे पुर्वाधिकारी यांनी नि.क्रं. ६४ खाली दिनांक २६.१०.२००७ रोजी मुददे कायम केले होते व त्यानंतर सदर मुददे दिनांक ०८.११.२०११ रोजी दुरुस्त करुन पुन्हा नवीन मुददे नि.क्रं. १०३ खाली कायम करण्यात आलेले आहे. त्यानंतर सदर दावा पुराव्यासाठी प्रलंबित असतांना प्रतिवादी क्रं. ८ व ९ यांनी नि.क्रं. १७१ खाली दिलेल्या दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ वरील अर्जाचे कामी प्रलंबित होते सदर अर्ज गुणदोषावर दिनांक ०४.०८.२०२२ रोजी नामंजुर करण्यात आला. त्यानंतर सदर अर्जावरील आदेशावर व्यथीत होवुन प्रतिवादींनी मा. उच्च न्यायालयाच्या दिवाणी पुर्नविलोकन अर्ज क्रं.३७/२०२३ दाखल केला होता व त्यामधील आदेशानुसार मा. उच्च न्यायालयाने सदर प्रकरण सदर आदेशापासुन एक वर्षाच्या आत निकाली काढण्याबाबत कालबध्द केलेले आहे.

९. सदर प्रकरणात वादीने अद्याप पुरावा दिलेला नसुन सदर प्रकरण वादीच्या पुराव्यासाठी प्रलंबित असतांना वादीने दिनांक २६.१०.२०२३ रोजी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे अवलोकन केले असता दुरुस्त दाव्यामध्ये वादीने श्री. नामदेव विठोबा झिम्मन यांच्या मृत्युची तारीख ०६.१०.२००१ ऐवजी ०६.१०.२०११ अशी नजरचुकीने नमुद करण्यात आलेली आहे. तसेच मुळ दाव्यात नामदेव विठोबा झिम्मन यांच्या मृत्यु तारीख ०६.१०.२००१ अशी नमुद करण्यात आलेली आहे त्यामुळे मुळ दाव्यात आणि दुरुस्त दाव्यात ज्याठिकाणी नामदेव विठोबा झिम्मन यांच्या मृत्यु तारीख ०६.१०.२००१ व ०६.१०.२०११ अशी नमुद आहे त्याठिकाणी २७.०९.२००१ अशी दुरुस्ती करुन मागितलेली आहे. तसेच वादी श्रीमती बिजलाबाई भास्करराव आहेर यांच्या लग्नांनतर नावात बदल झालेला आहे. त्यामुळे दाव्याचे पान क्रं. १ मध्ये वादीच्या नावानंतर बिजलाबाई या नावानंतर व भ्र. च्या आधी उर्फ अहिल्याबाई याचा समावेश करण्याची तसेच दाव्यामध्ये ज्या ज्या ठिकाणी बिजलाबाई असे नमुद आहे तेथे बिजलाबाई उर्फ अहिल्याबाई अशी दुरुस्ती करण्यात यावी अशी विनंती केलेली आहे. तसेच मुळ दाव्यामध्ये आणि दुरुस्त दाव्यामध्ये परिच्छेद क्रं. २ मध्ये ओळ क्रं. २ मध्ये अंदाजे या शब्दानंतर ' तीन महिण्यापुर्वी' आकडा आणि शब्द वगळण्यात यावा आणि त्याच्या जागी 'दिनांक २३.१२.२००५ रोजी' हे शब्द आणि तारीख दुरुस्त करण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

१०. सदर दुरुस्तीचे अवलोकन केले असता ती किरकोळ स्वरुपाची दिसत असुन त्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होतांना दिसुन येत नाही. प्रतिवादींनी सदर अर्जावर हरकत घेवुन सदर दुरुस्तीबाबतच्या कागदपत्रांबाबत वादीस पुर्वीपासुन माहिती होती तरीही वादीने सदर अर्ज उशिराने का दाखल केला याबाबत कारण दिलेले नाही. तसेच सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होत असल्याचे कथन केलेले आहे. सदर दाव्याचे अवलोकन केले असता सदर दावा हा दिनांक

11/1/24

०६.०६.२००६ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. सदर दावा सुमारे १७ वर्षांपासुन प्रलंबित आहे. सदर दाव्यामध्ये नि.क्रं. ६४ खाली दिनांक २६.१०.२००७ रोजी व त्यांनतर नि.क्रं. १०३ खाली ०८.११.२०११ रोजी मुददे कायम करण्यात आलेले आहे व तेव्हापासुन सदर दावा पुराव्यासाठी प्रलंबित आहे. दरम्यानच्या काळात मा. उच्च न्यायालयाने सदर प्रकरण कालबध्द केलेले आहे. सदर दाव्यामध्ये अद्याप वादीचे पुराव्याचे शपथपत्र येणे बाकी आहे.

**११.** सदर प्रतिवादींनी घेतलेल्या हरकतीनुसार वादीस सदर दुरुस्ती बददलच्या कागदपत्रांबाबत पुर्वीपासुन माहिती होते असे गृहित धरले तरी प्रस्तुत दाव्यामध्ये अद्याप वादीचे पुराव्याचे शपथपत्र येणे बाकी आहे. वादी करु पाहत असलेली दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची असुन त्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. सदर दुरुस्ती ही केवळ नामदेव विठोबा झिम्मन याच्या मृत्युच्या तारखेबाबत, वादीच्या नावाबाबत, व विठोबा झिम्मन यांची पत्नी कौशल्याबाई हिच्या मृत्युच्या तारखेबाबत आहे. सदर दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची असुन त्यामुळे दाव्यावर त्याचा फारसा परिणाम होणार नाही. परंतु वादींनी सदर अर्ज विलंबाने दाखल केलेला असल्यामुळे त्याबाबत वादींवर खर्च लादणे आवश्यक आहे. तसेच प्रतिवादींना सदर दुरुस्ती केल्यानंतर त्यांची बाजु मांडण्याची संधी उपलब्ध आहे. करिता मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. वादीचा निशाणी २०१ चा अर्ज प्रतिवादींना रक्कम रुपये १५००/- खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने विहित मुदतीत दुरुस्ती करावी.

(खुल्या न्यायालयात घोषित)

Pumkalse 11/01/2024

**(पी.एम.कोळसे)**

दिनांक- ११.०१.२०२४

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर (न्यायालय क्रं.१)

कन्नड